Meta Title -coriander seeds: **कोथिंबीर बियाणे निवड**

Meta Desc - **कोथिंबीर बियाणे निवड कशी करावी? |** How to choose coriander seeds? माहिती जाणून घेण्यासाठी हा लेख नक्की वाचा आणि आवडला तर शेयर करा.

---

नमस्कार शेतकरी मित्रांनो, आपल्या Krushi Mitra Satish वेबसाइटवर आपले स्वागत आहे. आजच्या लेखात आपण **कोथिंबीर बियाणे निवड कशी करावी?** माहिती पाहणार आहोत.

**कोथिंबीर बियाणे निवड कशी करावी?**

कोथिंबीर लागवडीसाठी बियाण्याची निवड अतिशय महत्त्वाची असते. बाजारात सध्या गावरण (देसी) आणि हायब्रिड असे दोन प्रकारचे बियाणे उपलब्ध आहेत.

**खालील तक्त्यामध्ये या दोन्ही प्रकारांची माहिती दिली आहे:**

| **प्रकार** | **बियानाचे नाव** | **वैशिष्ट्ये** |
|---|---|---|
| **स्थानिक वाण (गावरण)** | वाई धना | ▪ करड्या रंगाचा, लंबट आकाराचा धना<br>▪ स्वाद चांगला, पाने पोपटी व दातेरी<br>▪ गड्डी कमी तयार होते<br>▪ काही वेळेस पाने जांभळी-तपकिरी रंगाची निघतात<br>▪ काडी कडक असते |
| | बदामी धना | ▪ हा धना जळगाव भागातील खास जात आहे, म्हणून बाजारात "जळगाव धना" म्हणूनच ओळखतात.<br>▪ धना मोठा, गोलसर असतो.<br>▪ गड्डी पल्लेदार तयार होते.<br>▪ झाडाला फांद्या भरपूर असतात आणि काडी रसाळ असते. |

| | | |
|---|---|---|
| | | ▪ पाने मोठी, जाडसर, दाट आणि गर्द हिरवी, त्यामुळे बाजारात उठाव चांगला असतो.<br><br>▪ स्वाद थोडा कमी असला तरी, हॉटेल, लग्नसमारंभासाठी जास्त मागणी असल्यामुळे भावही चांगला मिळतो. |
| | गौरी धना | ▪ कोथिंबीर हिरवीगार आणि आकर्षक दिसते<br><br>▪ पाने मोठी आणि दाट, त्यामुळे गड्डी भरदार दिसते<br><br>▪ बाजारभाव कमी असेल तर ही कोथिंबीर ४ ते ६ दिवस उशीरा काढली तरी फुल येत नाही<br><br>▪ त्यामुळे नुकसान टाळता येते आणि भाव बघून काढणी करता येते<br><br>(पुणे, अहिल्यानगर,नारायणगाव या भागात प्रचंड लागवड) |
| | कस्ती धना | ▪ कोराची पाने, सुगंध खूप चांगला, काडी जाडसर व मजबूत आणि पाला दाट असतो.<br><br>▪ बाजारात कायम उत्तम मागणी आणि चांगला दर मिळतो.<br><br>(लातूर, धारशिव, सोलापूर या भागात प्रचंड लागवड) |
| | आंध्रा धना | ▪तपमान अधिक असल्यास वाढ कमी होते.<br><br>▪ठिकवण क्षमता जास्त, पाल्याला वास खूप असतो.<br><br>▪ फूल लवकर येते, त्यामुळे वेळेआधी काढणी करावी लागते.<br><br>(पुणे, अहिल्यानगर,नारायणगाव या भागात प्रचंड लागवड) |
| | अंकुर सीड्स नूतन | ▪ सरासरी उंची: 30 ते 45 से.मी.<br><br>▪ रंग: गडद हिरवा |

| | | |
|---|---|---|
| **(हायब्रिड धना)** | | ▪ही एक बहुपीक (कटिंग) जात असून 7 ते 10 दिवसांच्या अंतराने 3 ते 5 वेळा कापणी करता येते. |
| | बॉम्बे सुपर सीड्स सोनल | ▪पानांचा आकार: गोलसर व मोठा<br>▪कापणीसाठी कालावधी: 50 ते 60 दिवस<br>▪झाडाची उंची: 1 ते 1.5 फूट |
| | नामधारी सीड्स सुरभि | ▪ही जात खूपच आकर्षक असून, पाने मोठी, चमकदार आणि सुगंधदार असतात.<br>▪अनेक वेळा कापणी (कटिंग) करण्यासाठी योग्य जात आहे.<br>▪ही उशिरा फुलणारी जात असून, वर्षभर विक्रीसाठी उपयुक्त आहे. |
| | अशोक सीड्स AFA5 | ▪अत्यंत उत्तम दर्जाची विदेशी (इटालियन) जात<br>▪फुल येण्याचा वेग खूपच मंद - त्यामुळे जास्त वेळ कापणीसाठी उपयुक्त<br>▪पाने मोठी, जाडसर आणि रुंद, झाड उंच वाढते, काडी कडक आणि पानांना सुगंध चांगला असतो. |
| | बायोसीड रुचि | ▪पाने मोठी, जाडसर आणि रुंद, झाड उंच वाढते<br>काड कडक आणि पानांना सुगंध चांगला असतो<br>▪जास्त वेळ कापणीसाठी उपयुक्त |

**सारांश:**

कोथिंबीर लागवडीसाठी योग्य बियाण्यांची निवड अत्यंत महत्त्वाची आहे. या लेखात गावरण (स्थानिक) आणि हायब्रिड या दोन प्रमुख प्रकारांच्या बियाण्यांची वैशिष्ट्ये तपशीलवार दिली आहेत. वाई, बदामी, गौरी, कस्ती, आंध्रा या स्थानिक वाणांमध्ये चव, पाने, गड्डी, आणि बाजारमूल्य यावर आधारित फरक स्पष्ट करण्यात आले आहेत. तसेच, अंकुर नूतन, बॉम्बे सोनल, नामधारी सुरभि, अशोक AFA5 आणि

बायोसीड रुचि यांसारख्या हायब्रिड वाणांची देखील वैशिष्ट्ये दिली आहेत, जसे की अनेक वेळा कापणी क्षमता, उशिरा फुल येणे, पाने मोठी आणि सुगंधी असणे.

लेखक -

सतीश सोनवणे
मुपो. नांदगाव, तालुका - नगर,
जिल्हा - अहमदनगर

सतीश सोनवणे
मुपो. नांदगाव, तालुका - नगर,
जिल्हा - अहमदनगर